'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० | मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू


पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई** Email ID : shabdarutu@gmail.com

✲ वर्ष २ रे ✲ अंक २९ वा ✲ रविवार दि. २० एप्रिल २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✲ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

## परीक्षेच्या प्रश्नांवर विद्यार्थ्यांची आंदोलने

छत्रपती संभाजीनगर - महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात, यासाठी शेकडो विद्यार्थ्यांनी बुधवारी क्रांती चौकात ठिय्या मांडून आंदोलन केले. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातही स्टुडण्टस फेडरेशन ऑफ इंडियाच्या विद्यार्थ्यांनी विधी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेची तारीख, परीक्षा व मूल्यमापन विभागाने अचानक बदलल्याच्या विरोधात आवाज उठवला.

# राज-उद्धव ठाकरे एकत्र येणार?





मुंबई : महाराष्ट्रात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे पुन्हा एकदा एकत्र येऊ शकतात. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी याबाबतचे संकेत दिले. राज ठाकरे म्हणाले- आपल्यात राजकीय मतभेद आहेत, वाद आहेत, मारामारी आहेत, पण महाराष्ट्रासमोर या सर्व खूप लहान गोष्टी आहेत. महाराष्ट्र आणि मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र येणे ही फार मोठी अडचण नाही.

राज ठाकरे यांनी अभिनेते आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या यूट्यूब चॅनलवर तसे स्पष्ट संकेत दिले. महेश मांजरेकर यांनी राज यांना उद्धव यांच्याशी युती करण्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

यावरराजठाकरेम्हणाले की, कोणत्याही मोठ्या ध्येयासमोर आमच्यातील भांडणे लहान आहेत. यावर उद्धव ठाकरे यांचीही प्रतिक्रिया आली आहे, त्यांनी सांगितले की माझ्याकडून कधीही भांडण झाले नाही.

उद्धव यांना शिवसेनेत त्यांचा उत्तराधिकारी घोषित केल्यानंतर राज यांनी २७ नोव्हेंबर २००५ रोजी पक्षाचा राजीनामा दिला. यानंतर त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना' हा स्वतःचा पक्ष स्थापन केला. तेव्हापासून दोघांमधील संबंध चांगले नव्हते.

राज ठाकरे म्हणाले की, एकत्र येणे आणि एकत्र राहणे फार कठीण आहे असे मला वाटत नाही. प्रश्न फक्त इच्छाशक्तीचा आहे. हा माझ्या वैयक्तिक इच्छेचा किंवा स्वार्थाचा विषय नाही. मला वाटते की आपण महाराष्ट्राचे मोठे चित्र पाहिले पाहिजे. माझा असा विश्वास आहे की महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांमधील मराठी लोकांनी एकत्र येऊन एक पक्ष स्थापन केला पाहिजे.


एकनाथ शिंदे सत्तेत येणे आणि आक्षेप यावर राज म्हणाले, सर्वप्रथम, शिंदे यांचे जाणे किंवा आमदारांचे विभाजन होणे हा राजकारणाचा वेगळा भाग बनला. मी शिवसेना सोडली तेव्हा अनेक आमदार आणि खासदार माझ्याकडे आले. पण माझ्या मनात एकच गोष्ट होती की जर मी बाळासाहेबांना सोडले तर मी दुसऱ्या कोणाच्या हाताखाली काम करणार नाही. त्यावेळी ही परिस्थिती होती.


ते म्हणाले, मी जेव्हा शिवसेनेत होतो तेव्हा मला उद्धव सोबत काम करण्यास काहीच हरकत नव्हती. प्रश्न असा आहे की, समोरची व्यक्ती मला त्यांच्यासोबत काम करायला सांगते का? मी कधीही अशा छोट्या छोट्या गोष्टींमध्ये माझा अहंकार आणत नाही. जेव्हा महेश मांजरेकर यांनी त्यांना भाजपमध्ये सामील होण्याबाबत प्रश्न विचारला तेव्हा राज ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रासाठी किंवा मराठी लोकांसाठी मी जे काही बोलू किंवा करू शकतो, ते मी करेन. भाजप सोबत जाणे हे राजकीय असेल, पण माझे विचार त्यांच्या विचारांशी जुळत नाहीत. पण राजकारणात, कधी काय होईल हे कोणी सांगू शकत नाही. राजकारणात सर्व काही बदलते. इथे सर्व काही इतक्या वेगाने घडत आहे की कधी काय होईल हे सांगता येत नाही.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोन्ही पक्षांची कामगिरी खूपच खराब होती. जिथे उद्धव यांच्या यूबीटी पक्षाला फक्त २० जागा मिळाल्या. तर राज ठाकरेंच्या मनसेचे खातेही उघडले गेले नाही.

## तनिषा भिसे मृत्यूप्रकरणी डॉ. घैसास यांच्यावर गुन्हा दाखल

पुणे: तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात ससून रुग्णालयाचा दुसरा अहवाल समोर आला आहे. या अहवालातून डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. यानंतर अलंकार पोलीस ठाण्यात घैसास यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. कलम १०६ (१) नुसार घैसास यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घैसास यांच्या हलगर्जीपणामुळे तनिषा भिसे यांचा मृत्यू झाल्याचं अहवालात नमूद करण्यात आलं आहे.









भारतीय जनता पक्षाचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनिषा यांचा प्रसुतीनंतर दुर्दैवी मृत्यू झाला. जुळ्या बाळांना जन्म देऊन त्यांनी जगाचा निरोप घेतला. या प्रकरणात पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर गंभीर आरोप झाले. मंगेशकर रुग्णालयानं रुग्णाच्या कुटुंबाकडे १० लाख रुपयांची मागणी केली. पैसे नसतील, तर उपचार होणार नाहीत, अशी भूमिका रुग्णालयानं घेतली. त्यामुळे तनिषा यांना वेळेवर उपचार मिळाले नाहीत, असा दावा करत भिसे कुटुंबानं केला. त्यांनी रुग्णालय प्रशासनावर गंभीर आरोप केले. या सगळ्या प्रकरणाची चौकशी ससून रुग्णालयानं केली आहे. ससूनचा दुसरा अहवाल समोर आला असून त्यात अनेक गंभीर बाबी आहेत.


ससूनच्या दुसऱ्या अहवालात डॉ. सुश्रुत घैसास दोषी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यांच्या विरोधात कलम १०६(१) नुसार अलंकार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ससून रुग्णालयाचा पहिला अहवाल काल समोर आला होता. त्यातून तनिषा भिसे यांचं कुटुंब आणि त्यांच्यावर उपचार करणाऱ्या रुग्णालयांवर अप्रत्यक्षपणे ठपका ठेवण्यात आला होता. पण ससूनच्या दुसऱ्या अहवालात घैसास यांना दोषी धरण्यात आलं आहे.

## नवी कोरी पुस्तकं





**इनसायडर**
: लेखकाचे नाव :
पंकज कुरुलकर
किंमत रु. : ४५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर






**कथानायिकांच्या कथा**
: लेखकाचे नाव :
मधुकर धर्मापुरीकर
किंमत रु. : ३००/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर

# भाषा दूषित होत नाही; तर ती विस्तारते...! : रंगनाथ पठारे

मराठी भाषेचा इतिहास शोधत आपण सातवाहन काळापर्यंत मागे जाऊ शकतो. एवढे मागे न जाताही मराठीची खरी समृद्धी आपल्याला यादव साम्राज्यात पाहावयास मिळते. यादव काळात मराठी भाषेच्या सुवर्ण युगाला प्रारंभ झाला. 'चक्रधर-ज्ञानदेव-नामदेव एकनाथ तुकाराम' असा चारशे वर्षांचा कालखंड मराठी भाषा व साहित्य यांच्या सर्वांगीण श्रेष्ठत्वाचा कालखंड होता, असे म्हणणे वावगे होणार नाही. तेराव्या शतकात देवगिरीचे यादव साम्राज्य लयाला गेले. राजसत्ता व रयत यांच्यांमध्ये कोणत्याही प्रकाराचा संवाद रामदेवराय यादवाच्या काळात अस्तित्वात राहिला नव्हता. राजापासून त्याची प्रजा संपूर्णपणे तुटलेली होती. रामदेवराव यादवाचा प्रधान हेमाद्री हा कडवा वर्णाभिमानी ब्राह्मण असल्यामुळे चातुर्वर्ण्य व्यवस्थेची पकड मजबूत झालेली होती. अशावेळी चक्रधरांनी वर्णव्यवस्था नाकारणारा, स्त्री-पुरुष समता मानणारा आणि व्रतवैकल्यांना हद्दपार करणारा मार्ग समाजाला दाखवला.

श्रीकृष्ण भक्तीवर आधारित महानुभव पंथाची स्थापना करून, स्वतःला कृष्णावतार घोषित केले. त्याचबरोबर एक देव अथवा ईश्वर मानण्याचा संदेश दिला. मराठी समाजाला चक्रधरांमध्ये वर्णव्यवस्था व व्रतवैकल्य कर्मकांड यांच्यामधून मुक्तीचा पहिला मार्ग दिसला. त्याचबरोबर त्यांनी मराठी भाषेचा आग्रही व अनिवार्य पुरस्कार महानुभाव पंथासाठी केला. यामुळे मराठीत समृद्ध गद्य लेखनाची परंपरा निर्माण झाली. त्यानंतर ज्ञानदेव-नामदेव यांनी भागवत धर्माची स्थापना केली. त्याची संवादभाषा मराठीच होती. ज्ञानदेव अत्यंत प्रतिभावंत विद्वान होते, त्यामुळे त्यांची मराठी जनसामान्यांच्या मराठीपेक्षा वेगळी असणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. दुसऱ्या बाजूला भागवत धर्माचे समन्वयक, संघटक, प्रवक्ता व प्रचारक असलेल्या नामदेवरायांची मराठी जनसामान्यांची मराठी होती..

भागवत धर्माच्या प्रचारार्थ त्यांनी अखंड हिंदुस्थान पालथा घातला. हिंदुस्थान हा एक देश आहे, ही संकल्पना अधोरेखित केली. त्यांच्या प्रवासादरम्यान त्यांनी विविध भाषांमध्ये काव्यरचना करून नकळतपणे मराठीचा विस्तारच केला. मराठी व्यतिरिक्त कोणत्याही भाषेत काव्यरचना करताना त्या भाषेचा मराठीशी संकर घडवला. एका प्रकारे त्यांनी मराठी भाषा व समाज यांची नजर व्यापक केली. यामुळे मराठी दूषित होईल याची चिंता केली नाही. त्यांच्या या प्रयत्नामुळे मराठी दूषित झाली नाही, तर विस्तारली, असे म्हणता येते. या विस्तारामुळे मराठीची समृद्धी देखील झाली. आज अनेक अभ्यासक नामदेवरायांना हिंदी भाषेचे आद्यकवी म्हणून गौरवतात. ज्या हिंदी भाषेमुळे उत्तरेतील राजस्थानी, हिमाचली, हरियाणवी, बिहारी आदी भाषांचे अस्तित्व धोक्यात आले. त्या हिंदी भाषेचा आद्यकवी म्हणून मराठी भाषक नामदेवरायांना मान देण्यात येतो. एका प्रकारे नामदेवरायांनी हिंदीच्या आक्रमणापासून मराठीचे केवळ संरक्षणच केले नाही, तर तिला सशक्त देखील केले. आज आपण पाहतो, की हिंदुस्थानच्या मातीत जन्मलेली व एक अत्यंत सुंदर व समृद्ध भाषा असलेल्या उर्दूला ब्राह्मणी व्यवस्थेनी धर्माच्या नावानं केवळ मुस्लिमांची भाषा म्हणून बिंबवण्याचा प्रयत्न केला आहे. आज हिंदी म्हणजे हिंदूंची भाषा व उर्दू म्हणजे मुस्लिमांची भाषा असा गैरसमज निर्माण करण्यात मोठ्या प्रमाणात या व्यवस्थेला यश आलेले दिसते.



उर्दू व हिंदी या आपल्याच भाषा आहेत, आपल्याच मातीतील आहेत. उर्दू व हिंदी यांच्या मिश्रणातून तयार झालेली हिंदुस्थानी भाषा खऱ्या अर्थाने उत्तर भारतात वापरली जाते. त्यामुळे भाषांची अशी धार्मिक फाळणी योग्य नाही. यादवांनंतर मराठी समाजावर ज्याप्रमाणे परधर्मी राज्यकर्त्यांचे आक्रमण झाले, त्याचप्रमाणे मराठी भाषेवर त्यांच्या परक्या भाषेचे आक्रमण झाले. ज्ञानदेवांची मराठी पंडिती वळणाची असली, तरी नामदेव-तुकाराम यांची मराठी निखळ मराठी होती.

मुस्लिम राज्यकर्त्यांसोबत आलेल्या फारसी भाषेशी दोन हात करत नामदेव-तुकाराम यांच्या माध्यमातून मराठी भाषेने आपला निखळता जोपासली. यादवांच्या पतनापासूनतेब्रिटिशांच्याआगमनापर्यंत झालेल्या लढायांनी मराठी व फारसी यांना जवळ येण्याची संधी मिळाली. युद्धात एकमेकांशी लढणाऱ्या दोन भिन्न भाषक सैनिकांतील संदेशवहन देखील त्यांच्या एकमेकांच्या भाषांना एकमेकीत शिरकाव करण्याची संधी देत असते. राज्यकर्त्यांची भाषा असलेल्या फारसीचे आक्रमण मराठीने सहज पचवले, कारण कोणत्याही परक्या भाषेतील शब्दांना आत्मसात करण्याचे सामर्थ्य तिच्या व्याकरणात होते. आज अनेक फारसी शब्द मराठीने आपल्या रंगात असे काही मिसळून टाकले आहेत, की बहुसंख्य मराठी भाषकांना हे शब्द फारसी आहेत याची कल्पना देखील नाही. कोणत्याही भाषेत हे सामर्थ्य येण्यासाठी तिच्या मागे किमान हजार वर्षांची गौरवशाली परंपरा उभी असते. त्यामुळे मराठीने आपल्या वाटचालीत अशा अनेक भाषा पोटात घेत स्वतःचे मार्गक्रमण केले आहे. अन्य भाषेतील शब्दांच्या स्वीकारामुळे भाषा दूषित होत नसते, तर विस्तारत असते, हे आपण समजून घेतले पाहिजे. मुस्लिम, ब्रिटिश, पोर्तुगीज. अशा परकीय राज्यकर्त्यांच्या भाषेतील अनेक शब्द आज मराठीत आहे, ज्यांचा वापर आपण मराठी शब्द म्हणून करत आहोत. महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात मराठीचा सामना कन्नड, तेलगू, गुजराती, हिंदी इत्यादी भाषांसोबत झालेला आहे.

सीमावर्ती भागातील मराठीत त्या भाषांनी शिरकाव केला आहे, तर त्यांच्यामध्ये मराठीनं शिरकाव केलेला आहे. तेलंगणामध्ये आरे मराठी समाजाची काही खेडी आपल्याला पाहावयास मिळतात. येथील मराठी भाषकांवर तेलगूचा प्रभाव असला, तरी त्यांची मराठी टिकून आहे. एकच आहे की मुख्य मराठी भाषक समाजाशी संबंध तुटल्यामुळे त्यांची मराठी साचली अशी आहे. असे असले तरी मराठीचे हे एक रूप आहे. भोवताली तेलगूचा विळखा असताना आरे मराठी समाज तेलगूशी समन्वय साधत मराठी टिकवतो. यावरून हेच सिद्ध होते, की परभाषेमुळे भाषा दूषित होत नसते, तर विस्तारित होत असते.

जगाच्या मोठ्या भूभागावर ब्रिटिशांनी राज्य केल्यामुळे इंग्रजी आज जगाची संपर्क भाषा झाली. अशा विधानात कायम अर्धसत्य सांगितले जाते. इंग्रजीनी जगातील प्रत्येक भाषेतील वैशिष्ट्यपूर्ण व प्रभावी शब्दांचा संकल्पनांचा जसाच्या तसा स्वीकार स्वतःमध्ये केला आहे आणि करत आहेत, हे अर्धसत्य मात्र कायम दुर्लक्षित राहते. दरवर्षी ऑक्सफर्ड डिक्शनरी इंग्रजीत जसेच्या तसे समाविष्ट करण्यात आलेल्या जगातील विविध भाषांमधील शब्दांची सूची जाहीर करत असते. इंग्रजी भाषा हे शब्द आपले म्हणून स्वीकारते, यामुळे इंग्रजी भाषा दूषित झाली की विस्तारली हे वेगळे सांगण्याची गरज नाही. प्रत्येक जण स्वतःच्या बुद्धीने त्याचा शोध घेऊ शकतो. दुसऱ्या बाजूला आपल्यासमोर संस्कृत भाषेचे उदाहरण आहे. स्वीकाराची वृत्ती नसल्यामुळे संस्कृत केवळ ग्रांथिक भाषा म्हणून शिल्लक राहिलेली आपण पाहतो. त्याचबरोबर भाषेत शुद्ध - अशुद्धता हा भागच मुळी नसतो.

मराठीच्या बाबतीत पेशवाई व अव्वल इंग्रजी काळात चित्पावनी बोली म्हणजे शुद्ध अथवा खरी मराठी हा समाज पसरवण्यात आलेला आहे. त्याच्यावरच आधारित भाषा शुद्धीच्या चळवळी उभ्या करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. भाषा शुद्धीकरण हा एक भ्रम आहे. चित्पावनी बोलीपेक्षा खेड्यातील मराठी माणसानं मराठी सशक्त व समृद्ध केलेली दिसते. खेड्यातील मराठी समाजानं दैनंदिन जीवनात उपयुक्त व अपरिहार्य परकीय शब्दांचा सहज स्वीकार आपल्या बोलीत केला. कोल्हापूर भागात स्त्रिया देखील मी गेला मी आलो' असा स्वतःचा पुल्लिंगी उच्चार करतात, हा कन्नडचा प्रभाव आहे. आपला शेतकरी म्हणतो, गाडी लय वरलोड चाललीय. येथे तो 'ओव्हर लोड' हा इंग्रजी शब्द वापरत असतो.

शहरातील माणूस इमारतीला 'टोलजंग' म्हणतो, तेव्हा हा शब्द फारसी आहे, याची त्याला कल्पना नसते. न्यायालयाच्या भाषेत आजही अनेक फारसी शब्दांचा वापर सर्रास होता. नदीच्या बाबतीत ज्या प्रवाहाला अनेक प्रवाह येऊन मिळतात आणि पुढे एक मोठी नदी म्हणून ती ओळखली जाते. त्याचप्रमाणे स्वीकारामुळे कोणत्याही भाषेचा मुख्य प्रवाह दूषित होत नसतो, तर विस्तारत असतो. स्वीकारामुळे भाषेची श्रीमंती वाढत असते. त्यामुळे मराठी देखील आपल्या दोन-अडीच हजार वर्षांच्या प्रवासात अशा अनेक शब्दांना स्वीकारत इथवर पोहोचलेली आहे. अशा स्वीकारात ती केवळ टिकलीच नाही, तर विस्तारली आहे. यासाठी भाषेची शुद्ध - अशुद्धता अशा अंधश्रद्धा उत्पन्न भयातून मराठी भाषकांनी बाहेर पडले पाहिजे. बदलत्या भौतिक व सामाजिक जीवनासोबत येणारे प्रत्येक बदल आजवर मराठीने स्वीकारले तसेच स्वीकारत मराठीचा विस्तार केला पाहिजे.

(शब्दांकन : राहुल हांडे)

# संमेलनाच्या निमंत्रकपदाचा मान साताऱ्याला द्यावा

## शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची साहित्य महामंडळाकडे मागणी

पुणे : आगामी ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमंत्रकपदाचा बहुमान साताऱ्याला द्यावा,' अशी मागणी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी गुरुवारी साहित्य महामंडळाकडे केली. हा निर्णय साहित्य महामंडळाची स्थळ निवड समिती घेत असते. मात्र, संमेलन कोठेही झाले, तरी ते पश्चिम महाराष्ट्रामध्येच होईल,'



असे सांगतानाच गेल्या दहा वर्षांपासून साताऱ्याहून मागणी होत असून, साहित्य महामंडळ त्याचा सहानुभूतिपूर्वक विचार करेल', अशी ग्वाही साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

सरहद, पुणे आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, उद्घाटक नरेंद्र मोदी आणि स्वागताध्यक्ष शरद पवार यांच्या भाषणावर आधारित मु. पो. तालकटोरा' या पुस्तकाचे प्रकाशन शिवेंद्रसिंहराजे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, सरहद संस्थेचे संजय नहार, शैलेश पगारिया, श्रीराम पवार आणि शैलेश वाडेकर या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमात मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या भोसले यांच्यासह महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

भोसले म्हणाले, ३२ वर्षांपूर्वी म्हणजे १९९३ मध्ये सातारा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविण्यात आले होते, त्या वेळी अभयसिंह महाराज यांनी स्वागताध्यक्ष म्हणून काम केले होते. आता साताऱ्याला संमेलन दिले, तर त्याच पद्धतीने आम्ही नियोजन करू. पण, संमेलनात वाद होणारच नाही, याची खात्री देऊ शकत नाही. साताऱ्याच्या वादांचा डब्बा आम्ही कायमचा बंद केला आहे. बाहेरून वाद झाले, तर ते सांगू शकत नाही.'

रस्त्यांचा प्राधान्यक्रम ठरवून कामे हाती घ्यावीत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची सूचना एखाद्या मंत्र्याचा आंदोलक म्हणून स्वागत व सत्कार इतिहासात पहिल्यांदाच झाला असेल,' अशी टिप्पणी भोसले यांनी केली. दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात मराठी भाषिकांना खुला प्रवेश मिळण्यासाठी, तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या मराठी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची सोय करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

जोशी म्हणाले, दिल्लीच्या साहित्य संमेलनात विविध विचारधारांची आणि मतांची माणसे व्यासपीठावर होती. आपल्या विचारांशी ठाम राहतानाही त्यांच्यातील सौहार्द आणि वैचारिक मोकळेपणाचे दर्शन घडले. महाराष्ट्राच्या हितासाठी पक्ष, विचारधारा आणि राजकारण दूर ठेवून महत्त्वाच्या प्रश्नांसाठी एकत्र येण्याची मानसिकता आणि राजकीय इच्छाशक्ती निर्माण झाली, तरच महाराष्ट्राचे भले होईल. देशाला विचार आणि दिशा देणारे राज्य अशी महाराष्ट्राची ओळख जपली पाहिजे.'

मराठी भाषेची ओळख कधीच पुसली जाणार नाही. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देणे हा एकच ध्यास घेऊन महाराष्ट्र साहित्य परिषदेसह सर्वांनी प्रयत्न केले. दिल्लीतील आंदोलन, तसेच सतत पाठपुरावा करून या इच्छेला मूर्त स्वरूप मिळाले आहे. दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यशस्वी केले, याचे कौतुक आहे. महाराष्ट्र आता मागे वळून पाहणार नाही. दिल्लीच्या तख्तावर महाराष्ट्राची पकड घट्ट झालेली पाहायला मिळेल.

*- शिवेंद्रसिंहराजे भोसले,*
सार्वजनिक बांधकाममंत्री

## त्या शिधापत्रिकांवर टाच!

नाशिक : जिल्ह्यातील अपात्र शिधापत्रिकाधारकांची शोधमोहीम पुरवठा विभागाने सुरू केली आहे. गेल्या सहा महिन्यांत तब्बल २१ हजार ६६१ शिधापत्रिकांधारकांनी एकदाही धान्य उचल केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पुरवठा विभागाने या शिधापत्रिकांवरील धान्य पुरवठा तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

सरकार रेशन दुकानांच्या माध्यमातून अंत्योदय आणि प्राधान्यक्रमानुसार रेशनकार्डधारकांना दरमहा धान्य वितरीत करते. रेशन वाटपापूर्वी ई-पॉस मशिन्स्वर बायोमेट्रिक पध्दतीने लाभार्थींच्या अंगठ्याचे ठसे घेतले जातात. महिन्याकाठी लाखो लाभार्थी स्वस्त धान्याचा लाभ घेतात. या व्यवस्थेत अधिक पारदर्शकता आणण्याकरीता लाभार्थींचे ई-केवायसी करण्यात येते आहे. लाभार्थींची माहिती अद्ययावत करणे हा त्यामागील उद्देश आहे. तसेच ई-केवायसीसह अपात्र रेशनकार्डची शोधमोहीम राबवावी, अशाही सूचना राज्यभरातील पुरवठा विभागांना सरकारने केल्या आहेत.

जिल्हा पुरवठा विभागाने नाशिक व मालेगाव धान्य वितरण अधिकारी तसेच पंधरा तहसील कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील अपात्र रेशनकार्डची शोधमोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत जुलै ते डिसेंबर या कालावधीत एकदाही धान्य उचल न केलेले २१ हजार ६६१ शिधापत्रिकाधारक आढळून आले. त्यामध्ये अंत्योदयच्या २,८६३ व प्राधान्य शिधापत्रिकांची संख्या १८ हजार ७९८ इतकी आहे. या शिधापत्रिकांवरील एकूण लाभार्थींची संख्या ५६ हजार ५२१ आहे. त्यामुळे पुरवठा विभागाने या रेशनकार्डवरील धान्याचे वितरण तूर्तास थांबविले आहे.

# यापुढे विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक हजेरी

अहिल्यानगर : राज्य सरकारने आता सर्व शाळा आणि महाविद्यालयांत बायोमेट्रिक हजेरी लागू केली असून, ७५ टक्के हजेरी अनिवार्य असणार आहे. यामुळे शाळा, कॉलेजमध्ये जाणे गरजेचे होणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२५ पासून हा निर्णय लागू होईल. राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची हजेरी वाढवण्यासाठी राज्य सरकारने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.



२०१८ मध्ये घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी आता कठोरपणे केली जाईल, ज्यामुळे विद्यार्थ्यांची हजेरी वाढेल आणि शाळा-महाविद्यालयांमध्ये शिस्त राखली जाईल. येत्या शैक्षणिक वर्षापासून ७५ टक्के हजेरी अनिवार्य केली जाणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयात नियमितपणे उपस्थित राहण्याची गरज भासणार आहे. राज्य सरकारचा उद्देश विद्यार्थ्यांना नियमितपणे महाविद्यालयात उपस्थित राहण्यास प्रोत्साहित करणे आणि महाविद्यालयीन शिक्षणाचा दर्जा सुधारणे आहे. काही विद्यार्थी महाविद्यालयाऐवजी खासगी शिकवणी वर्गांना जास्त उपस्थित राहतात, पण या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयात उपस्थित राहण्याचे महत्त्व समजेल. यामुळे शाळा-महाविद्यालयांमध्ये शिस्त राखली जाईल आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कार्य सुधारेल.

राज्य सरकारचा हा निर्णय विद्यार्थ्यांच्या शाळा आणि महाविद्यालयातील उपस्थितीत वाढ करेल. बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू केल्याने विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळा-महाविद्यालयात उपस्थित राहण्याची प्रेरणा मिळेल.

### शिक्षकांनाही बायोमेट्रिक अनिवार्य

दरम्यान, राज्यातील अनुदानास पात्र शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती तत्काळ बायोमेट्रिक अथवा चेहरा ओळख प्रणालीद्वारे नोंदविण्याचे निर्देश शिक्षण विभागाने यापूर्वीच दिले आहेत. तसेच बायोमेट्रिक प्रणाली चेहरा ओळख प्रणालीद्वारे उपस्थितीची अट पूर्ण करण्यासाठी सर्व अंशतः अनुदानित शाळांना देण्यात आलेल्या मुदतीचे पालन न करणाऱ्या शाळांचे वेतन अनुदान रोखून ठेवण्यात येईल, असा इशाराही यापूर्वी देण्यात आलेला आहे.

# २२ एप्रिलनंतर तापमान घटण्याचा अंदाज

पुणे : शहर आणि परिसरात उन्हाच्या तीव्र झळा, वाढलेला उष्मा असे वातावरण आणखी काही दिवस सहन करावे लागणार आहे. सध्या उष्णतेच्या लाटेसदृश स्थिती निर्माण झाली असून, पुढील चार ते पाच दिवस कमाल तापमान ४० ते ४२ अंश सेल्सियस राहणार आहे. २२ एप्रिलनंतर तापमानात किंचित घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

यंदा एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच तापमानाचा पारा वाढला आहे. दिवसा असलेल्या तीव्र उन्हाच्या झळांमुळे वातावरणातील उष्मा वाढला आहे. त्यामुळे किमान तापमानातही वाढ झाली आहे. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, बुधवारी शिवाजीनगर येथे ४१.२, कोरेगाव पार्क आणि मगरपट्टा येथे ४०.८, हडपसर येथे ४०.२, चिंचवड येथे ३९.१, एनडीए येथे ३८.९ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले. तर गुरुवारी शिवाजीनगर येथे ४०.१, कोरेगाव पार्क आणि मगरपट्टा येथे ४०.१, पाषाण येथे ४०, हडपसर येथे ३९.९, चिंचवड येथे ३८.६, एनडीए येथे ३८.२ अंश सेल्सियस तापमान होते.

हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस. डी. सानप म्हणाले, पुढील काही दिवस मध्य महाराष्ट्रात उष्ण आणि दमट वातावरणाचा इशारा देण्यात आला आहे. शहर आणि परिसरात कमाल तापमान ४० ते ४२ अंश सेल्सियसदरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच, उत्तरेकडील राज्यांत वाढलेले तापमान, तिकडून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे तापमानवाढ होत आहे. उष्णतेच्या लाटेसदृश स्थिती निर्माण झाली आहे. २२ एप्रिलनंतर हवेतील बाष्पाचे प्रमाण वाढून हवामान ढगाळ होण्याची, तापमानात किंचित घट होण्याची शक्यता आहे.'

# संत शेख महंमद महाराज मंदिरासाठी मुख्यमंत्र्यांशी बोलणार

## श्रीगोंदा शहर कडकडीत बंद पाळून तहसील कार्यालयावर मोर्चा

श्रीगोंदा : वारकरी संप्रदाय जातीयता मानत नाही. श्रीगोंद्यात संत शेख महंमद यांचा परंपरेने उत्सव साजरा केला जातो. संत शेख महंमद महाराज यांच्या मंदिराच्या जीर्णोद्धारा आड येणाऱ्या आमीन शेख नावाचा मीठाचा खडा बाजूला काढून टाकावा लागेल. संत शेख महंमद यांचे मंदिर हे वारकऱ्यासाठी इतिहास आणि अस्मितेचा प्रश्न आहे. मंदिराचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी मुख्यमंत्री यांच्याशी बोलणार असल्याचे प्रतिपादन हभप बंडातात्या कराडकर यांनी श्रीगोंदा येथे केले. श्रीगोंदा शहरातील संत शेख महंमद महाराज यांच्या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी गावकऱ्यांनी, वारकऱ्यांनी श्रीगोंदा शहर कडकडीत बंद पाळून तहसील कार्यलयावर मोर्चा काढून धरणे आंदोलन केले आहे. यावेळी हभप बंडातात्या कराडकर म्हणाले, संत परंपरेतून संत शेख महंमद यांना बाजूला जाऊ देणार नाही.



संत शेख महंमद यांचे आध्यात्मिक साहित्य ज्यांना मान्य नाही. तो त्यांचा वंशज कसा असेल. मुख्यमंत्री यांच्याशी मी बोलतो. सरकारने गावकऱ्यांना बेमुदत धरणे धरण्याचा वेळ आणू नये. लवकरात लवकर मंदिराचा जीर्णोद्धार सुरू व्हावा, असे आवाहन त्यांनी केले. संत तुकाराम महाराज यांचे वंशज माणिक महाराज मोरे यांनी आमीन शेख यांना संत कळले नाहीत. त्यांना त्याचे वाङ्मय माहिती नाही. शेख महंमद यांच्या समाधीला कान लावा. तुम्हाला आत्म साक्षात्कार होईल. मंदिराचे आता काम थांबणार नाही. हा विषय संपूर्ण वारकऱ्यांचा आहे. संत शेख महंमद यांनी भगवी पताका खांद्यावर घेऊन पंढरीची वारी केली, असे सांगितले. खा. निलेश लंके यांनी समजाच्या भावना लक्षात घेऊन सरकारने दर्गाह ट्रस्ट तातडीने रद्द करावे, समाजाची भावना महत्वाची असल्याचे सांगितले. माजी आमदार बबनराव पाचपुते यांनी मंदिराच्या विषयात समोरची माणसे त्या पात्रतेची नाहीत. केवळ चर्चा करून प्रश्न सुटणार नाही. मुख्यमंत्री यांची वेळ घेतली आहे. मुख्यमंत्री हा प्रश्न सोडवतील, असा विश्वास व्यक्त केला.

आमदार विक्रम पाचपुते यांनी मंदिरासाठी संयम महत्वाचा आहे. आंदोलन हे ठिय्या आंदोलन आहे. शासन दरबारात प्रश्न कायद्याच्या चौकटीत बसत नसेल तर तो कायदा बदलण्याचे काम जनभावना करत असते. संयमाने पुढे जायचे आहे. ज्या सूचना येतील त्या मान्य आहे. आंदोलनाची दखल शासनाने घेतली आहे. घनश्याम शेलार यांनी आमीन शेख यांनी देवस्थान मठाचे नाव बदलले रेकॉर्डवर सुफी संत हजरत शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट असे नाव बदलले आहे ते गावाला मान्य नाही, असे स्पष्ट केले. यावेळी राजेंद्र नागवडे यांनी शेख याने हेकेखोरपणा सोडावा. गावाला निर्णय घेण्याचे वेळ आली आहे. तो नाटक करतो, पण कृती करत नाही, असे सांगितले. यावेळी बाबासाहेब भोस, नाना कोथंबीरे, टिळक भोस, अरविंद कापसे, रंगनाथ बिबे, बाळासाहेब नाहटा, बाळासाहेब महाडिक, रामचंद्र महाराज दरेकर, प्रणोती जगताप, मनोहर पोटे आदींची भाषणे झाली.

# हिंदी सक्तीमागे सुकाणू समिती अंधारात

## मराठीचे महत्त्व कमी होणार नसल्याचा शिक्षण विभागाचा दावा

पुणे : राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना पहिलीपासून हिंदी भाषेव्यतिरिक्त अन्य भारतीय भाषांचेही पर्याय उपलब्ध करून देण्याची शिफारस अभ्यासक्रम आराखडा सुकाणू समितीने केली होती. मात्र, ही शिफारस डावलून शिक्षण विभागाने हिंदीची सक्ती केल्याचे सूत्रांनी सांगितले. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) मात्र अभ्यासक्रम आराखड्याला सुकाणू समितीची मंजुरी असल्याचे सांगितले. हिंदीचा समावेश केल्यामुळे मराठीचे महत्त्व कमी होणार नाही. मराठीशी दुजाभाव केला जाणार नाही असा दावा शिक्षण विभागाकडून करण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची शालेय शिक्षणाच्या स्तरावर अंमलबजावणी २०२५-२६पासून करण्याबाबतचा शासन निर्णय विभागाने बुधवारी प्रसिद्ध केला. त्यानुसार पहिलीपासून अभ्यासक्रमात हिंदी विषयाचा समावेश करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर, सुकाणू समितीतील एका सदस्याशी संपर्क साधला असता, पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती न करता, अन्य भारतीय भाषांचे पर्यायही उपलब्ध करण्याची शिफारस सुकाणू समितीने केली होती. मात्र, शासन निर्णय वेगळाच प्रसिद्ध झाला आहे,' असे या सदस्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# २४, २५ तारखेला सरपंच आरक्षण सोडती

अहिल्यानगर : ग्रामविकास विभागाने ५ मार्च रोजी राज्यातील पुढील पाच वर्षासाठीचे सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करून ते राजपत्रात प्रसिध्द केलेले आहे. यासाठी प्रवर्गनिहाय राखीव अथवा खुल्या सरपंच पदाच्या जागा निश्चित करण्यासाठी २४ व २५ एप्रिलला उपविभागीय पातळीवर महिला सरपंच यांचे तर सर्वसाधारण आणि अन्य प्रवर्गाचे तहसीलदार यांच्या पातळीवर ईश्वरी चिठ्ठ्या काढण्यात येणार आहे. यासाठीचे नियोजन जिल्हा ग्रामपंचायत विभागाकडून अंतिम करण्यात आले आहे.



२०२५ ते २०३० या पाच वर्षाच्या कालावधीत जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील १ हजार २२३ ग्रामपंचायतींपैकी ६२४ ठिकाणी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना सरपंच होण्याची संधी मिळणार आहे. यात ३१२ ठिकाणी महिलांचा समावेश असणार आहे. यासह ३३० ठिकाणी ओबीसी प्रवर्गातील व्यक्तींसाठी सरपंच पदाचे आरक्षण राहणार असून यात १६५ महिलांना संधी मिळणार आहे.

तर ११९ ठिकाणी अनुसूचित जमातीसाठी आरक्षण राहणार असून यात ६० ठिकाणी महिला, तसेच १५० ठिकाणी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षण राहणार असून यात ७५ महिला सरपंच यांचा समावेश राहणार आहे. याबाबतचे आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र यामध्ये ५ मार्च रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे. यात जिल्ह्यात बिगर अनुसूचित क्षेत्रातील १२२३ ग्रामपंचायतमध्ये १५० ठिकाणी अनुसूचित जातीसाठी सरपंच पद आरक्षित राहणार असून यात ७५ महिलांचा समावेश राहणार आहे. ११९ ठिकाणी सरपंच पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित राहणार असून यात ६० महिलांचा समावेश राहणार आहे. ओबीसी प्रवर्गासाठी ३३० ठिकाणी सरपंच पद आरक्षित राहणार असून यात १६५ महिलांचा समावेश असणार आहे तर ६२४ ठिकाणी सरपंच पद हे खुल्या प्रवर्गासाठी राहणार असून यात ३१२ खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचाचा समावेश राहणार आहे.

दरम्यान, कोणत्या तालुक्यात कोणत्या गावात महिला, सर्वसाधारण आणि अनुसूचित जाती-जमातीचे आरक्षण निघणार याचा तपाशील जिल्हाधिकारी कार्यालयातील ग्रामपंचायत विभागाने तयार करून तो मान्यतेसाठी जिल्हाधिकारी यांना पाठवला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया या कार्यक्रमाला मान्यता दिल्यानंतर २४ आणि २५ एप्रिलाला उपविभागीय पातळी आणि तहसील कार्यालय पातळीवर सरपंच पदाच्या सोडती काढण्यात येणार आहेत.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

| | |
|---|---|
| **कृषि विषयक पुस्तके** | |
| **डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील** | |
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform

Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization

Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Digital India | Vision India | MAKE IN INDIA | MSME

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी शासन प्रयत्नशील - प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी

## कृषी क्षेत्रातील एआय धोरण वापर कार्यशाळा मुंबईत संपन्न

मुंबई : कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरणावरील मसुद्याबाबत सल्लामसलत करून राज्यातील कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल यासाठी शासन आग्रही असल्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सांगितले.

मंत्रालय येथे कृषी विभागाने कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरणावरील मसुद्याबाबत सल्लामसलत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा आयोजित केली होती यावेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी बोलत होते.

प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी म्हणाले की, केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये उपयोग करण्यावर भर देत आहे. महाराष्ट्र शासनाने देखील हे धोरण अवलंबले आहे.

या कार्यशाळेत २३ हून अधिक संस्था व ३५ हून अधिक तज्ज्ञ सहभागी झाले होते. यात मोठ्या व मध्यम उद्योगसमूहांचे प्रतिनिधी, स्टार्टअप्स, बहुराष्ट्रीय संस्था आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश होता. या कार्यशाळेचा उद्देश म्हणजे राज्यातील कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करता येईल, यावर सखोल चर्चा करण्यात आली. मुख्यत्वे डेटा गुणवत्ता, डेटा देवाण-घेवाण यंत्रणा, स्थानिक पातळीवर आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे, शेतकऱ्यांना एआय तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन व डेटा मॉनिटायजेशन, स्टार्टअपसाठी सक्षम परिसंस्थेची



निर्मिती आदी मुद्द्यांवर चर्चा झाली.

धोरण मसुद्यात शेतकऱ्यांना समग्र विचाराअंती प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी सक्षम धोरणात्मक चौकट तयार करणे, उत्पादनात वाढ, उत्पादन खर्चात घट, व वास्तविक वेळेतील डेटावर आधारित निर्णयक्षमतेस मदत करणे यावर भर देण्यात यावा याबाबत चर्चा करण्यात आली. या नव्या धोरणाद्वारे विविध डेटासेट्सचे एकत्रीकरण, शाश्वत व लवचिक शेती पद्धतींचा प्रचार, पुरवठा साखळी कार्यक्षमतेत सुधारणा, संशोधन व नवोपक्रमांना चालना, वित्तीय समावेश आणि क्षमतेचा विकास हे सर्व उद्दिष्ट आहेत. कार्यशाळेत डेटा सुरक्षेचे महत्त्व, डेटा गुणवत्ता व जोखमीचे व्यवस्थापन अशा मूलभूत बाबींवरही चर्चा झाली. एआयच्या मदतीने महाराष्ट्रातील कृषी विकास व शाश्वतता सुनिश्चित करण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी पोक्रा प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंग, कृषी विभागाचे उपसचिव संतोष कराड,जागतिक बँकेचे प्रतिनिधी व्ही. कानुंगो, रंजन समंत्राय आणि जागतिक बँक गटाचे अरुण शर्मा.,फाय्लो कंपनीचे सुधांशु राय, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार कडून कविता भाटिया, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे जे. सत्यनारायण आणि भारतीय सार्वजनिक प्रशासन संस्थेचे एस. एन. त्रिपाठी, सह्याद्री फार्म्सचे विलास शिंदे, वाधवानी फाउंडेशनचे परितोष आनंद आणि बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशनच्या निधी नाथ श्रीनिवास, सिडवर्क्सचे राजा वडलमणी, फ्लिपकार्टचे डिप्पी वांकानी, टाफेचे पुलकित मित्तल तसेच बायरचे आनंद श्रीकर, टेक्नो सर्वचे कृष्णन हरिहरन, ग्रो इंडिगोचे परिन तुराखिया, महिंद्रा अँड महिंद्राचे करमयोग सिंग व सुमित दारफळे, नॅसकॉमचे एम. चोकलिंगम, सॅटसुरेचे प्रखर राठी आणि इनोसापियन अॅग्रो टेक्नॉलॉजीजचे सारंग नेरकर उपस्थित होते. या बैठकीत कृषी व तंत्रज्ञान क्षेत्रातील नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यावर विशेष भर देण्यात आला.

# सहकारी साखर कारखान्यांकडून पाच हजार कोटींच्या कर्जाची मागणी

मुंबई : राज्यातील सहकारी कारखान्यांकडून देय असलेला उसाचा रास्त आणि किफायतशीर दर (एफआरपी), वाहतूक आणि तोडणी खर्च आणि कामगारांचे थकीत वेतन भागविण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाने राज्य सरकारकडे पाच हजार कोटी रुपयांच्या सॉफ्ट लोन'(तात्पुरत्या स्वरुपातील कमी मुदतीचे कर्ज) ची मागणी केली आहे. संघाकडून सातत्याने पाठपुरवा केला जात असला तरीही सरकारकडून अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

राज्यातील उसाचा गळीत हंगाम नुकताच संपला आहे. साखर कारखान्यांचा ताळेबंद सुस्थितीत येण्यासाठी किमान १४० दिवस गाळप चालणे आवश्यक आहे. पण, यंदा सरासरी ७० ते ९० दिवस हंगाम चालला आहे. त्यामुळे साखरेचा उत्पादन खर्च वाढला आहे. हंगाम कमी दिवसांत संपल्यामुळे कारखान्यांनी हंगाम सुरू करण्यासाठी केलेली आर्थिक गुंतवणूक अडचणीत आली आहे. सुमारे ९० टक्के कारखान्यांचे आर्थिक ताळेबंद तोट्यात गेले आहेत.

त्यामुळे उसाचा रास्त आणि किफायतशीर दराची थकीत रक्कम १४३० कोटी आणि वाहतूक आणि तोडणी खर्चापोटी ११०० कोटी, अशी एकूण सुमारे २७०० कोटी रुपये आणि उर्वरीत रक्कम कामगारांचे चार - पाच महिन्यांपासून थकलेले वेतन देण्यासाठी, अशी एकूण पाच हजार कोटी रुपयांच्या सॉफ्ट लोनची मागणी केली आहे. राज्य सरकारच्या थकहमीनंतर राज्य सहकारी बँक किंवा राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी) कर्ज देते. हे कर्ज देताना व्याज सवलतीसह कर्ज परतफेडीच्या अटी निश्चित केल्या जातात.

यंदाचा उस गाळप हंगाम सुरू करण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी सुमारे साडेपाच हजार कोटींचे कर्ज राज्य सहकारी बँकेकडून घेतले होते. अन्य वित्तीय संस्थांकडून घेतलेले कर्ज वेगळेच आहे. राज्य सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जापैकी सुमारे चार हजार कोटी रुपयांचे कर्ज थकले आहे. या अल्प आणि मध्यम मुदतीच्या कर्जांचे पुनर्गठण करावे. तीन वर्ष कर्ज रक्कम गोठवावी. त्यानंतर सात किंवा दहा वर्ष कर्जफेडीची मुदत द्यावी, अशी मागणीही साखर संघाने सरकारकडे केली आहे.

### या पूर्वीही दिले होते सॉफ्ट लोन

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना या पूर्वी २०१४, २०१५, २०१९ मध्ये विविध योजनांच्या अंतर्गत सॉफ्ट लोन दिले गेले होते. त्या नंतर कोरोनाच्या टाळेबंदीच्या काळात केंद्र सरकारनेही सहकारी कारखान्यांना आर्थिक मदत केली होती. केंद्र सरकारने एफआरपी कर्ज, २००५ मध्ये नाबार्ड पॅकेज म्हणूनही मदत केली होती. केंद्र सरकारच्या संस्थांमार्फत कर्ज देताना काही नियम, अटी घातल्या जातात. मात्र, राजकीय हित आणि दबावामुळे कारखाने नियम, अटी पाळत नाहीत. त्यामुळे कारखाने आर्थिक अडचणीत येताना दिसतात, असे मत साखर उद्योगातील तज्ज्ञ विजय आवताडे यांनी दिली.


## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हुशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |

| | | | |
|---|---|---|---|
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# रोहित शर्मा झाला भावूक



रोहित शर्मा हा शांत कर्णधार आहे, हे सर्वांनाच माहिती आहे. पण तो किती भावूक आहे, हे एका कार्यक्रमात पाहायला मिळालं. रोहितचा हा व्हिडिो आता चांगलाच व्हायरल झाला आहे. MI vs SRH या आयपीएलच्या सामन्यानंतर मुंबई क्रिकेट संघटनेच्या कार्यक्रमात रोहित शर्मा बोलत होता.

रोहित म्हणाला, मी त्या वर्ल्ड कपमध्ये नव्हतो...

रोहित वानखेडे स्टेडियमच्या कार्यक्रमात म्हणाला की प्रेक्षक म्हणून इथे सामने बघितले होते; पण वानखेडेच्या खेळपट्टीवर खेळाडू म्हणून पाय ठेवला तेव्हा अंगावर रोमांच उभा राहिला. त्यानंतर अगदी आतापर्यंत या स्टेडियमने आठवणींचा खजिनाच ओंझळीत टाकला आहे. आपण याच स्टेडियमवर वर्ल्ड कप वनडे स्पर्धाही जिंकली. अर्थात मी त्या संघात नव्हतो (प्रेक्षक आणि रोहितचा हशा). वानखेडेवरील ती फायनल घरून बघतानाची भावनाही काही औरच होती. अशा ऐतिहासिक स्टेडियममधील एका स्टँडला माझे नाव असणार, यावर अजूनही विश्वास बसत नाही. हा मान मला देणाऱ्या एमसीएचा मी कायम ऋणी राहीन. माझे नाव स्टेडियमच्या स्टँडवर कोरलेले बघेन तेव्हा अर्थातच भावना पुन्हा दाटून येतीलफ असे रोहित म्हणाला.

मी १४ आणि १६ वर्षांखालील गटाच्या क्रिकेट सरावासाठी आझाद मैदानात यायचो. हा सराव संपला की, वानखेडे स्टेडियममध्ये आलेल्या रणजीपटूंची एक झलक बघण्यासाठी धाव घ्यायचो. आजच्याप्रमाणे तेव्हाही वानखेडेफ्ची सुरक्षाव्यवस्था कडेकोट असे. त्यातून लाडक्या रणजीपटूंना बघणे म्हणजे तारेवरची कसरत असे. पुढे या स्टेडियममध्ये खेळाडू म्हणून दाखल झालो तेव्हा अक्षरशः भारावून गेलो होतोफ अशी भावना रोहितने व्यक्त केली.

मुंबईकर क्रिकेटपटूंनी भारतीय संघावर वर्चस्व गाजवायला सुरुवात केली आहे, असे वाक्य कार्यक्रमाच्या महिला सूत्रधाराने उच्चारताच रोहित तत्परतेने म्हणाला, हा सिलसिला ७०च्या दशकापासूनचा आहे. मुंबईच्या मैदानाने दिलेल्या गुणवत्तेने मायदेशासह परदेशातील मैदा-नेही दणाणून सोडली. आयसीसीच्या स्पर्धांमध्येही मुंबईकर क्रिकेटपटूची कामगिरी अधोरेखित होते. आयसीसीकडून मुंबईतील क्रिकेटपटूंचा विशेष गौरव केला जातोफ असा खास उल्लेख रोहितने केला.

मराठी-हिंदी अशा मिश्र भाषेतील हॅशटॅगफ्सह दक्षिण मुंबईतील सत्पतारांकित हॉटेलमध्ये मुंबई क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) मुंबई टी-२० क्रिकेट लीगच्या तिसऱ्या मोसमाचे बिगुल वाजले. ही स्पर्धा पुनरागमन करणार असल्याचे वृत्त मटाफ्ने आधीच दिले होते.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021